मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई कार्यालयासाठी जागा वाटप करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र. शाकाजा-११२४/प्र.क्र.३६/२०२४/निवास-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : १० जुलै, २०२४

<u>प्रस्तावना</u> :

जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील राज्य उत्पादन शुल्काचे कार्यालय नवीन इमारत “राज्य उत्पादन शुल्क भवन”, प्लॉट नं.१४५०, महानगर पालिका सभागृह मार्ग, फोर्ट, मुंबई येथे नव्याने बांधलेल्या शासकीय इमारतीमध्ये स्थलांतरीत झाल्यामुळे दुसऱ्या मजल्यावरील राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाच्या ताब्यातील १९४८२ चौ.फुट जागेपैंकी ३८४९ चौ.फुट जागा मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई कार्यालयासाठी वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

<u>शासन निर्णय</u> :

जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाच्या ताब्यातील १९४८२ चौ.फुट जागेपैंकी ४५६९.२५ चौ.फुट जागा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने मिडीया मॉनिटरींग सेंटरसाठी वापरात घेतलेली आहे. आता निवडणूका संपल्यामुळे सदर ४५६९.२५ चौ.फुट जागेपैंकी पश्चिम बाजूकडून दक्षिण बाजू पर्यंत ३८४९ चौ.फुट इतकी जागा मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई कार्यालयासाठी वाटप करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांनी उपरोक्त जागेचा ताबा संबंधितांना दयावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०७१०१७०४५९२१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEVIDAS SANDUJI BHAGURE

Digitally signed by DEVIDAS SANDUJI BHAGURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=0990ae5e49835c85a735703503a82e3cd3cdde019c8ce2fdb9c7765ef1b7c39f, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2D19FEFD30011466572B4E69158C3099ADDED4CBB59D6833F72ED93F73A564DC, cn=DEVIDAS SANDUJI BHAGURE
Date: 2024.07.10 17:48:38 +05'30'

(दे. सां. भगुरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य
३. मा.मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

८. सामान्य प्रशासन विभाग, का.२१(आस्था)/का.२१ रोख, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

१०. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

११. मुद्रांक जिल्हाधिकारीमुंबई , यांचे कार्यालय, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१

१२. कार्यकारी अभियंता, ईलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन इमारत, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१. (सोबत नकाशा जोडला आहे)

१३. उप अभियंता, दक्षिण (सा.बां.) उप विभाग, जुन्या एम.टी.डी.सी. कार्यालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.

१४. मुख्य दूरध्वनी चालिका, मंत्रालय, मुंबई.

१५. निवडनस्ती / कार्या.निवास-१